# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 32 ■ शुक्रवार, दि. 22 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



सर्वांनी मिळून सण - उत्सव शांततेत व आनंदाने साजरे करूया : जिपोअ अनुज तारे >>पान 2

सरकारी नोकरदारांना ५ दिवस आधीच पगार मिळणार >>पान 3

शब्दाशी बांधिलकी जोपासणारा आमदार >>पान 4


**सुविचार**

मनातील नकारात्मकता दूर करा.




'कांतारा चॅप्टर १'मधील अभिनेता गुलशन देवैयाचा लुक अनावरीत!

आतील पान

# लोकसभेत १२ आणि राज्यसभेत १४ विधेयके मंजूर

## लोकसभेत १२० तासांऐवजी फक्त ३७ तास चर्चा

**नवी दिल्ली : ऑनलाइन गेमिंग विधेयक आज संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा शेवटच्या दिवशी राज्यसभेतही मांडण्यात आले. राज्यसभेत ऑनलाइन गेमिंग विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे कामकाज १० मिनिटांसाठी थांबवण्यात आले. या विधेयकाचा उद्देश ई-स्पोर्ट्स आणि ऑनलाइन सोशल गेमिंगला प्रोत्साहन देताना सर्व प्रकारच्या ऑनलाइन मनी गेमवर बंदी घालणे आहे. महिनाभर चाललेल्या अधिवेशनात लोकसभेने १२ आणि राज्यसभेने १५ विधेयके मंजूर केली.**

वारंवार व्यत्यय, तहकूब आणि बहिष्कार सत्र सुरूच राहिले. शेवटच्या दिवसाच्या कामकाजादरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, सभागृहात १२० तासांच्या चर्चेचा वेळ निश्रि्चत करण्यात आला होता, त्यामुळे केवळ ३७ तासांची चर्चा होऊ शकली. यामुळे लोकसभा अनिश्रि्चत काळासाठी तहकूब करण्यात आली. २१ जुलै रोजी हे अधिवेशन सुरू झाले. दोन्ही सभागृहांमध्ये ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेव्यतिरिक्त, या अधिवेशनात फारच कमी काम झाले.


दुसरीकडे, राज्यसभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जेपीसीकडे पाठवण्यासाठी ३ विधेयके मांडली. अश्रि्वनी वैष्णव यांनी ऑनलाइन गेमिंग विधेयक चर्चेसाठी मांडले. तथापि, विरोधकांनी घोषणाबाजी सुरूच ठेवली. नंतर ते राज्यसभेनेही मंजूर केले. यानंतर, राज्यसभा देखील अनिश्रि्चत काळासाठी तहकूब करण्यात आली. विरोधी पक्षाच्या खासदारांनी बिहार एसआयआरवर चर्चेची मागणी करत राहिले. त्यांच्या विरोधामुळे आणि गदारोळामुळे शेवटच्या दिवशीही दोन्ही सभागृहात कामकाज होऊ शकले नाही.

**लोकसभेत फक्त ५५ प्रश्नांची उत्तरे देण्यात आली**

अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की या अधिवेशनात ४१९ प्रश्न्न विचारण्यात आले. त्यापैकी ५५ प्रश्न्नांची उत्तरे देण्यात आली. संपूर्ण अधिवेशनात चर्चेसाठी १२० तासांचा वेळ निश्रि्चत करण्यात आला होता. तथापि, फक्त ३७ तासांची चर्चा होऊ शकली.

**लोकसभेचे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब**

लोकसभेचे कामकाज दुपारी १२ वाजता



पुन्हा सुरू झाले. पंतप्रधान मोदी देखील सभागृहात पोहोचले. दरम्यान, विरोधकांनी एसआयआर मुद्द्यावर चर्चेची मागणी केली आणि गोंधळ घातला. सभागृहात राष्ट्रगीत वाजवण्यात आले, त्यानंतर सभागृह अनिश्रि्चत काळासाठी तहकूब करण्यात आले.

## संभाजी ब्रिगेडच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन



**बुलढाणा/प्रतिनिधी:** विधानसभा निवडणुकीदरम्यान महायुती मधील नेत्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार राज्यातील सरसकट शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ पीक विम्याची रक्कम जमा करण्यात यावी, यासह शेतकऱ्यांसंदर्भात विविध मागण्यासह ईव्हीएम बंद करून बॅलेट पेपरद्वारे मतदान घेण्यात यावे. या मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेड पक्षाच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवशीय लक्षणीय धरणे आंदोलन करण्यात आले. मागण्या मंजूर न झाल्यास तीव्र स्वरूपाच्या आंदोलनाचा इशारा संभाजी ब्रिगेडच्या वतीने देण्यात आला आहे.

## जिल्ह्यातील साडेसातशे आरोग्य कर्मचारी बेमुदत संपावर गेल्याने आरोग्य यंत्रणा प्रभावित




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य विभागात कार्यरत असलेले कर्मचारी अधिकारी हे आपल्या विविध मागण्यांसाठी १९ ऑगस्ट पासून बेमुदत संपावर गेले आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील जवळपास साडेसातशे कर्मचारी अधिकाऱ्यांनी काम बंद केल्याने आरोग्य यंत्रणा प्रभावित झाली आहे. तीन दिवसाच्या अतिवृष्टीमुळे वातावरणात मोठ्या प्रमाणात बदल होऊन सर्दी खोकला आणि तापेचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत, आणि असे असताना हे आरोग्य कर्मचारी संपावर गेल्यामुळे इतर कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडला आहे. अजून काही दिवस हे कर्मचारी संपावर राहिल्यास आरोग्य यंत्रणेचा बोजवारा उडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## ताटात उष्टे अन्न ठेवले म्हटले अन् मुलाकडून वडिलाची कुऱ्हाडीने वार करून हत्या

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** ताटात उष्टे अन्न ठेवले, या किरकोळ कारणावरून मुलाने स्वतःच्या जन्मदात्या वडिलांची कुऱ्हाडीने वार करून हत्या केली. त्यानंतर मृतदेह प्लास्टिकच्या पोत्यात भरून पूर्णा नदीत टाकल्याची धक्कादायक घटना संग्रामपूर तालुक्यातील बोडखा येथे १३ ऑगस्ट रोजी घडली असून, ती १९ ऑगस्ट रोजी उघडकीस आली. या प्रकरणी मृतकाची सुन व आरोपीची पत्नी हिनेच पोलिसात फिर्याद दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संग्रामपूर तालुक्यातील बोडखा येथील रामराव तेल्हारकर असे मृतकाचे नाव असून, आरोपी मुलगा शिवाजी रामराव तेल्हारकर याने हे भयानक कृत्य केले.. ''काम करत नाहीस, घराकडे लक्ष देत नाहीस'' असे म्हटल्याने वडील व मुलामध्ये वाद झाला... त्यानंतर ताटात उष्टे अन्न ठेवण्याच्या किरकोळ कारणावरून सुरू झालेल्या वादाचे रूपांतर क्रूर हिंसाचारात झाले आणि रागाच्या भरात शिवाजीने वडिलांवर कुऱ्हाडीचा वार करत त्यांचा खून केला होता. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे मात्र घटनेतील मृतकाचा मृतदेह अद्याप पर्यत मिळालेले नाही हे विशेष.

तर घटना लपवण्याच्या प्रयत्न अपयशी ठरल्याने तब्बल सहा दिवसानंतर अर्थात १९ ऑगस्ट रोजी पोलिसांना या घटनेचा उलगडा झाला. तालुक्यातील ग्राम बोडखा येथील रहिवासी रामराव तेलारकर यांनी त्यांचा मुलगा शिवाजीला हत्या लपवण्यासाठी शिवाजी व त्याचा मुलगा कृष्णा या दोघांनी मिळून मृतदेह प्लास्टिकच्या पोत्यात भरून दुचाकीवर तालुक्यातील खिरोडा पुलाजवळ नेला आणि पूर्णा नदीत फेकून दिला...या घटनेची माहिती काही दिवसांपर्यंत गुप्त ठेवण्याचा प्रयत्न झाला. मात्र अखेर रामराव यांची सून योगिता शिवाजी तेलारकर हिने तामगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पो या धक्कादायक घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहेत. पोलिसांनी तातडीने फॉरेन्सिक टिमला घटनास्थळी पाचरण करून या घटनेचा अधिक तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

## सिंहगडावरील तानाजी कड्यावरुन युवक दरीत कोसळला

पुणे : सध्या पावसाळी पर्यटनासाठी मित्र कंपनी, कुटुंबीय आणि वेगवेगळे ग्रुप्स निसर्गरम्य ठिकाणी जात आहेत. पुणे जिल्हा हाही पर्यटनासाठी प्रसिद्ध असून सिंहगड किल्ला आणि परिसरात दरवर्षी देशाच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक येतात. त्यातच, पुण्यातील सिंहगड किल्ल्याच्या तानाजी कड्यावरून खोल दरीत कोसळून एक पर्यटक बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली आहे. सिंहगड किल्ल्याच्या तानाजी कडा येथे हवा पॉइंटजवळील खोल दरीत पाय घसरून पडल्याने पर्यटक बेपत्ता झाला असून घटनास्थळी प्रशासन व पोलीस कर्मचारी पोहोचले आहेत. गौतम गायकवाड (वय २४) असे बेपत्ता तरुणाचे नाव असून त्याच्यासाठी शोधमोहिम राबवली जात आहे. गौतम हा हैदराबादवरुन मित्रांसमवेत पर्यटनास आला होता.

## दमदार कारवाई करणाऱ्या पथकाला १० हजाराचं रिवॉर्ड, एका व्यक्तीकडून ४१ तलवारी जप्त



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरात शहरामध्ये अपर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी सायंकाळी मोठी कारवाई करीत एका व्यक्तीकडून ४१ तलवारी जप्त केल्या आहेत. नांदुरा येथील शेख वसीम शेख सलीम रा. शाहीण कॉलणी नांदुरा याने त्याचे राहते घरुन अवैध रित्या धारदार तलवारी विक्री करण्यासाठी मोटार सायकल वर घेवुन जाणार अशा माहीतीवरुन पोलिसांनी शाहीण कॉलणी येथे जावुन खबरे प्रमाणे आरोपीच्या घरात झडती घेतली असता त्याचे जवळून एकुण ४१ तलवारी किंमती ८२,०००/-रुपयाच्या मिळुन आल्या.. दमदार कारवाई ने खुश झालेल्या पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी कारवाई यशस्वी करणाऱ्या पथकाला १० हजाराचं रिवॉर्ड काल नांदुरा येथे जाहीर केला.

## गुटखामाफीयाचे मोडले कंबरडे, ७७ लाखाचा मुद्देमाल जप्त


### मेहकर पोलीसांची धाडसी कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी धाडसी कारवाई करून तब्बल ७७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांच्या धडाकेबाज कारवाईने गुटखा माफियांचे धाबे दणाणले आहेत.

घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार २१ ऑगस्ट रोजी पहाटे पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, समृद्धी महामार्गावरुन एका आयशर वाहनातून शासनाने प्रतिबंधित केलेल्या अन्नपदार्थाची (गुटखा) वाहतूक होत आहे.यावरुन त्यांनी सदर माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांना याबाबत अवगत करुन त्यांचे मार्गदर्शनाखाली पथक तयार करुन पहाटे ४ वाजताच्या सुमारास





समृद्धी महामार्गावरील नागपूर ते मुंबई वाहिनीवरील चॅनल नंबर २८२ जवळ मिळालेल्या माहितीचे अनुषंगाने सापळा लावून शासनाने प्रतिबंधित केलेल्या अन्नपदार्थाची (गुटखा) वाहतूक करणारा एक आयशर टेम्पो पकडला व त्याची तपासणी केली असता त्यात पुर्ण भरलेला शासनाने प्रतिबंधित केलेल्या अन्नपदार्थाची (गुटखा) मिळून आला.

त्यावरुन सदर मुद्देमालावर कारवाई करणेकरिता अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग वसावे यांना अवगत करून मुद्देमाल तपासला असता एकूण ६ लाख ५२ हजार रुपयांचा शासनाने प्रतिबंधित केलेला अन्नपदार्थ (गुटखा) व १२ लाख रुपये किंमतीचे आयशर वाहन असा एकूण ७७ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्यात एक आरोपी ताब्यात घेण्यात आला असून अजुन आरोपी निष्पण होण्याची शक्यता आहे. निष्पण आरोपीला अटक करण्यासाठी पथक तयार करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार हे करीत आहेत.

सदर कामगिरी पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार, सपोनि संदीप बिरांजे, पोउपनि वसंत पवार, पोउपनि गणेश कड, पोउपनि संदीप मेधने, पोलीस अंमलदार श्रीकृष्ण गवई, रमेश गरड, संजय पवार, सुरेश काळे, लक्ष्मण कटक, प्रभाकर शिवणकर, शरद कापसे, करीम शहा, इब्राहीम परसुवाले, शिवाजी चिम, संदीप भोंडणे यांनी तसेच अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग वसावे व त्यांचे सहकाऱ्यांनी केली आहे.




# सर्वांनी मिळून सण - उत्सव शांततेत व आनंदाने साजरे करूया : जिपोअ अनुज तारे

## शहरांचे योग्य नियोजन करा नाही तर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना

मुसळधार पावसाने मुंबईसह नवीमुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यात हाहाकार उडवला. मुंबई उपनगरात २४ तासात २३८.२ मिलिमीटर पाऊस झाला तर ठाणे शहरात १३३ मिलिमीटर पाऊस पडला. मुंबई शहरातही ११० मिलिमीटर इतका पाऊस झाला. कोकणातही पावसाने अशीच तडाखेबंद हजेरी लावली. केवळ मुंबई, ठाणे आणि कोकणच नव्हे तर संपूर्ण राज्यात पावसाने दाणादाण उडवली. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला. नाशिकमध्येही पावसाने कहर केला. विदर्भात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांना पावसाने तडाखा दिला तीच परिस्थिती मराठवाड्यातही झाली एकूणच पावसाने सपूर्ण राज्यात कहर केला. गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने असे रौद्ररूप धारण केले की सर्वांचीच पाचावर धारण बसली. या पावसाने मोठ्या प्रमाणात वित्तहानी तर झालीच पण काही ठिकाणी जीवितहानी देखील झाली. काहींना आपला जीव देखील गमवावा लागला. नद्या, नाल्यांना पूर आला. अनेकांचा संसार पाण्यात बुडाला, शेतीवाडी पाण्याखाली गेल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेल्याने बळीराजा हताश झाला. क्षणात होत्याचे नव्हते झाले. देशाची आर्थिक राजधानी असलेली आणि कधीही न थांबणारी मुंबईही या पावसाने काही काळ ठप्प झाली. या पावसाने मुंबईची पुन्हा एकदा तुंबई झाली. जोरदार पावसाने मुंबईचे जनजीवन विस्कळीत झाले. शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. पावसामुळे शासकीय आणि अशासकीय कर्मचाऱ्यांना देखील शासनाने सुट्टी दिली. जागोजागी पाणी तुंबल्याने रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले. लोकांच्या घरात पाणी आले. त्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. शेकडो गाड्या जाग्यावरच थांबल्या त्यामुळे महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली. काही ठिकाणी दरड कोसळल्याने महामार्ग बंद झाले. रेल्वे मार्गावर पाणी साचून रुळ पाण्याखाली गेल्याने लांब पल्ल्याच्या अनेक गाड्या रद्द कराव्या लागल्या. लांब पल्ल्याच्या गाड्याच नाही तर अनेक लोकलही रद्द कराव्या लागल्या. काही मार्गावर धीम्या गतीने लोकल सोडाव्या लागल्या. पावसाचे पाणी रेल्वे स्थानकावरून धबधब्याप्रमाणे ओसंडून वाहत होते. पावसामुळे रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे तांत्रिक बिघाड झाल्याने मोनोरेल जाग्यावरच थांबली. त्यात शेकडो प्रवासी अडकले. आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशामक जवानांच्या पथकाने आपली जबाबदारी चोख पार पडल्याने प्रवाशांची सुरक्षित सुटका झाली. केवळ नशीब बलवत्तर होते म्हणूनच प्रवाशांचा जीव वाचला. या पावसाने २६ जुलै २००५ ला मुंबईत झालेल्या पावसाची आठवण करून दिली. त्यावेळी झालेल्या पावसात देखील मुंबईची अशीच अवस्था झाली होती. २६ जुलैच्या पावसानंतर आपण कोणताही धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. २६ जुलैला निसर्गाने शहरांचे योग्य नियोजन करा नाहीतर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना असा इशारा देऊन धडा शिकवला होता तरीही त्यातून आपण काहीही शिकलो नसल्याने दरवर्षी ये रे माझ्या मागल्या असेच चालू आहे. शहरीकरण करताना नागरी नियोजनाची आखणी न केल्याने शहरांच्या सीमा वाढत गेल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. नियोजनाचा आराखडा तयार न करता कागदावरील नकाशाच्या सीमा वाढवून महानगराची मांडणी करणारे शासन आणि प्रशासन याला जबाबदार आहे. मुबई पुण्यासारख्या मोठ्या शहरांच्या सीमा विस्तारित चालल्या आहेत. या शहरात दरवर्षी नव्या गावांची भर पडत आहे. नगर नियोजनाकडे गांभीर्याने न पाहता नागरीकरणाचा निर्णय घेतल्याने ही पूरस्थिती निर्माण झाली. शहरांच्या विस्तारण्याच्या शहरीकरणात पर्जन्यवाहिन्या, मलनिस्सारन अशा विविध विभागांचे एकत्रीकरण करून नियोजनाची मांडणी करण्याची प्राथमिकताही पूर्ण केली जाते का असाही प्रश्न निर्माण होतो. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि एमएमआरडीए यांचा एकत्र मेळ बसत नसल्याने शहरांचे नियोजन कोलमडत आहे. उघडी गटारी, तुंबलेले नाले, अनधिकृत बांधकामे, अरुंद रस्ते, वाढती लोकसंख्या, सिमेंटची वाढती जंगले, सिमेंटची रस्ते, जागोजागी बसवलेली पेव्हिंग ब्लॉक्स या सर्वांचा एकत्रित परिपाक म्हणजे ही पूरस्थिती. सरकारने आतातरी जागे होऊन शहर नियोजनाचा योग्य निर्णय घ्यावा अन्यथा भविष्यात यापेक्षाही भीषण परिस्थितीला सामोरे जागे लागेल.

## शांतता समिती सभा उत्साहात संपन्न

दैनिक आपला विदर्भ




**वाशीम/प्रतिनिधी:**येत्या २७ ऑगस्ट पासून श्री.गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील हिंदू - मुस्लिम बांधव सण उत्सव एकमेकांसह समन्वयाने साजरे करतात. यावर्षी देखील हे सण उत्सव सर्वांनी मिळून शांततेत आणि गुण्यागोविंदाने,आनंदाने साजरे करूया असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारेयांनी केले. या उत्सवादरम्यान व श्री.गणेश विसर्जनादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व संबंधित प्रशासकीय यंत्रणेचे प्रमुख अधिकारी व शांतता समिती सदस्यांची २० ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजनभवन सभागृहात जिल्हास्तरीय शांतता समितीचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत अध्यक्षस्थानावरून श्री तारे बोलत होते.यावेळी अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, राजेंद्र जाधव, अपर पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल, उपविभागीय पोलिस अधिकारी लता फड यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

पोलिस अधीक्षक तारे पुढे बोलताना म्हणाले, यावर्षी आपण सर्व मिळून डिजेमुक्त सण उत्सव साजरे करूया. जिल्हा डिजेमुक्त व्हावा. यामुळे स्थानिक लोककलावंत पारंपारिक वाद्य वाजविणाऱ्या कलावंतांना रोजगार उपलब्ध होईल. पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची स्थापना करण्यात यावी. तसेच गणपती दान ही नविन संकल्पना आपण राबवुया. असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. डिजेमूक्त गणेश मंडळांचा जिल्हास्तरावर सन्मान करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सण उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता प्रत्येकाने घ्यावी. सर्व गणेश मंडळ व नागरिकांनी पोलिसांना सण उत्सवाच्या काळात सहकार्य करावे. यापूर्वी सुद्धा नागरिकांच्या सहकार्यामुळे शांतता ठेवता आली. सण-उत्सव साजरे करताना इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.समाजात शांतता राहावी हे महत्त्वाचे आहे.समाजात असुरक्षितता नसली पाहिजे.ती विकासाला बाधक आहे.समाजाचा आपण एक घटक आहोत.समाज पुढे गेला पाहिजे यासाठी विधायक कामे करावी.समाज माध्यमातून जे आक्षेपार्ह संदेश पाठविण्यात येतात, ते इतरत्र पाठवू नये.आक्षेपार्ह संदेश असेल तर जवळच्या पोलीस स्टेशनला त्याची माहिती दयावी म्हणजे संबंधितावर कारवाई करता येईल.पोलिसांच्या सोशल मीडिया सेलच्या माध्यमातून आक्षेपार्ह सोशल मीडियाच्या पोस्टवर लक्ष ठेवण्यात येत आहे.कायद्याच्या चौकटीत राहूनच पोलीस मदत करणार असल्याचे ते म्हणाले. महीलांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासन तत्पर असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

श्री पाटील म्हणाले,डीजेचे प्रदूषण करण्यापेक्षा पारंपारिक वाद्यांचा वापर करा. नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात यावेत. सर्व उत्सव आनंदात साजरे करा. येणारे सर्व सणोत्सव सलोख्याने आनंदी वातावरणात साजरू करूया. सण उत्सवादरम्यान वापर होणाऱ्या डिजेमुळे अनेक दूष्परीणाम होतात. उत्सव साजरे करतांना दुसऱ्यांना आपल्या वागणूकीचा त्रास होणार नाही याची जाणीव आपल्याला असली पाहीजे. असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

श्री .घुगे म्हणाले ,उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याबाबत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.सदर शासन निर्णय सर्व गणेश मंडळांना पोलिस विभागामार्फत पाठविण्यात येणार आहे. शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार आहे. हा पुरस्कार देण्यासाठी निवड करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असल्याची माहिती श्री. घुगे यांनी सभेत दिली. जिल्ह्यातील मंडळांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय निवड समिती गठित करण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.plda@gmail.com या ईमेलवर स्पर्धेचे परिपूर्ण अर्ज गणेश चतुर्दशीच्या एका दिवसापूर्वीपर्यंत पाठवावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. सभेदरम्यान काही पदाधिकाऱ्यांनी व गणेश मंडळाच्या सदस्यांनी मते मांडली.

सभेला सर्व उपविभागीय अधिकारी,सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी,सर्व तहसीलदार,सर्व नगरपालिका व नगरपंचायतचे मुख्याधिकारी, शांतता समितीचे पदाधिकारी,गणेश मंडळांचे पदाधिकारी,सरपंच,पोलीसपाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बुलढाण्यात येत्या पाच दिवसांत विखुरलेल्या ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता, हवामान खात्याचा अंदाज



**बुलढाणा/प्रतिनिधी:** प्रादेशिक हवामान केंद्र, नागपुर द्वारे प्राप्त हवामान अंदाजानुसार बुलढाणा जिल्ह्यात येत्या पाच दिवसांत विखुरलेल्या ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. बुलढाणा जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी गेल्या ४-५ दिवसात मध्यम ते मुसळधार पाऊस झाला आहे. या पावसाचे अतिरिक्त पाणी शेतात साचणार नाही यासाठी साचलेल्या पाण्याचा योग्य मार्गाने ताबडतोब निचरा करावा. कारण पावसाचे पाणी शेतात दीर्घकाळ साचून राहिल्यास पिकांवर बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता बळावते. पाऊस पडल्यानंतर उच्च आर्द्रता, ढगाळ हवामान यामुळे पिकांवर कीड, रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता जास्त असते. म्हणून कीड-रोग व्यवस्थापनासाठी नेवन क्लेम शिफारसीत कीडनाशकांचा वापर योग्य प्रमाणात व कोरडे हवामान असताना करावा. पावसाळ्यात जनावरांना रोगाची लागण होण्याची शक्यता असते. म्हणून जनावरांच्या गोठा स्वच्छ ठेवावा तसेच मोठ्याभोवती पावसाचे पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच हवामान आधारित कृषी सल्ला प्राप्त होण्यासाठी मेघदत या मोबाईल अपचा वापर करावा आणि कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा वेशीत जिल्हा कृषी हवामान केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## संत सेना महाराज पुण्यतिथी उत्साहात



**वाशीम/प्रतिनिधी:** नाभिक समाजाच्या वतीने श्री समर्थ जानगीर महाराज संस्थांनवर श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी उत्सवात साजरी करण्यात आली या निमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सालाबादप्रमाणे याही वर्षी नाभिक समाजाच्या वतीने श्री संत सेना महाराज यांचे पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १९ ऑगस्ट रोजी रात्री एकादशीनिमित्त हरिभक्त परायण गोपाल महाराज जाधव शेलगांव इंगोले यांच्या हरिकीर्तनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्यानंतर द्वादशीच्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला हा सर्व कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता नाभिक समाजाच्या वतीने अतिथी परिश्रम घेतले आहे..

## 'कांतारा चॅप्टर १'मधील अभिनेता गुलशन देवैयाचा लुक अनावरीत!

मुंबई - 'कांतारा चॅप्टर १' हा 'कांतारा'चा सीक्वेल असला तरी प्रत्यक्षात तो प्रीक्वेल आहे. त्याच्या दिग्दर्शन आणि लेखनाची जबाबदारी पुन्हा एकदा ऋषभ शेट्टी यांनीच सांभाळली आहे. या चित्रपटात महत्वाची भूमिका साकारणाऱ्या गुलशन देवैयाचा फर्स्ट लुक नुकताच अनावरीत करण्यात आला. गुलशन देवैया या चित्रपटात कुलशेखर ही भूमिका साकारत आहे. अभिनेत्याचं कुलशेखर अवतार समोर आल्यानंतर त्याच्या भूमिकेची दिशा आणि ती कांताराच्या विश्वाला कोणते नवे वळण येईल, याविषयी उत्कंठा वाढली आहे.

'कांतारा चॅप्टर १' चित्रपटाबद्दल : होम्बळे फिल्म्सच्या बहुप्रतीक्षित पॅन-इंडिया चित्रपटातून पुन्हा एकदा त्या रहस्यमय जगाचे दर्शन घडणार याची चाहूल लागली आहे. पहिल्या भागानं लोककथा, श्रद्धा आणि मानवी भावना यांचे सुंदर संमिश्रण दाखवले होते. आता प्रीक्वेल त्या कथानकाच्या मुळांमध्ये उतरून आणखी खोल भावनिक स्तरांची अनुभूती देणार आहे. दरम्यान या फिल्मचं छायालेखन अरविंद एस. कश्यप यांच्या आकर्षक सिनेमॅटोग्राफीनं सजले असून, संगीतकार बी. अजनिश लोकनाथ यांचे सूर प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. निर्मितीचा भार विजय किरगंदूर यांच्या होम्बळे फिल्म्स या नामांकित बॅनरखाली उचलला गेला आहे.

## लोकनेते भाऊसाहेब फुंडकर यांच्या जयंतीनिमित्त ना.आकाश फुंडकर यांनी केले अभिवादन



**बुलढाणा/प्रतिनिधी:** लोकनेते स्व. पांडुरंग (भाऊसाहेब) फुंडकर यांना जयंतीनिमित्त निमित्त सिध्दीविनायक टेक्निकल कॅम्पस येथील स्व.भाऊसाहेब फुंडकर यांच्या शक्तिस्थळ या समाधीस्थळी ज्येष्ठ चिरंजीव तथा भाजप प्रदेशाध्यक्ष सोशल मीडिया सागर फुंडकर व कामगार मंत्री ॲड. आकाश फ ुंडकर यांनी भाऊसाहेब फुंडकर यांचे समाधीला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. सकाळपासून भाऊसाहेबांच्या चाहत्यांनी गर्दी केली आज शेतकऱ्यांसाठी विविध योजना प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. राज्य सरकार हे भाऊसाहेबांच्या अपेक्षित असलेल्या विचारांवर काम करते आहे. शेतकऱ्यांसाठी पाच हजार कोटीची योजना शेतकऱ्यांना समर्पित करण्यात आली. हे पाहूनच भाऊ साहेबांना नक्की आनंद होत असेल.आज भाऊसाहेब फ ुंडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्व कार्यकर्ते येथे येऊन भाऊसाहेबांची आठवण सोबत ठेवून नतमस्तक होऊन शिदोरी घेऊन जात असतात. अशी प्रतिक्रिया भाऊसाहेबांची पुत्र कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी व्यक्त केली आहे.



## भाजीपाला विकणाऱ्याचा प्रामाणिकपणा मिळालेला पर्स केला परत



**उमरखेड/प्रतिनिधी:** आज दररोज च्या जीवनात तडजोड, पदरमोड, उच्च तत्व ला फाटा, नीतिमत्तेचा अभाव, सौजन्य, प्रामाणिकपणा बघायला मिळत नाही कारण प्रचंड व्यवहार वादी जग एवढा गतिमान झालं आहे की,त्याला वेळ नाही कि हे प्रामाणिक आहे कि बेइमानिचे. जग निष्ठूर,भेसुर झालं आहे आज हर छोट्या मासाला मोठा मासा गिळंकृत करत आहे असे विचार करणाऱ्याची संख्या फोफावत चाललेली आहे. तर जगात असे ही काही लोक आहे की,प्रामाणिकपणा प्राण कंठाशी आले तरी सोडणार नाही तर पूर्ण जीवन प्रामाणिकपणामध्ये जगणार.असाच एक प्रत्य ढाणकी मध्ये बघायला मिळाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी, इरफान शेखजी शेख ढाणकी, हे उमरखेड वरून आपले काम करून रात्री ला ढाणकी कडे वापस येताना यांचे पर्स उमरखेड ते ढाणकी रोड च्या रात्री १२ते ०१च्या दरम्यान पडले होते अशी माहिती त्यांनी सोशिअल मीडिया वर टाकली होती की,त्या मध्ये त्यांचे ओरिजनल कागदपत्रे आहेत . त्याच दिवशी गणपत बाबुराव कवडे रा बिटरगाव,भाजीपला विक्रेते हे बिटरगाव येथून उमरखेड मंडी मध्ये जात असताना रात्री २ वाजता हरदडा देवस्थान जवळ रोड पर्स सापडला असता त्यांनी त्यातील आधार कार्ड वरील नाव व माहिती वाचून तो ढाणकीतील नागरिकाच आहे कळताच त्यांनी त्यांची ओळख असलेल्या ढाणकी मधील बशीर भाई ईट वाले यांना कॉल करून कळवले कि या नावाचे कागदपत्रे व २४४० रुपये असलेले पर्स सापडले आहे तुम्ही यांना ओळखता का?बशीर भाई ने त्यांची मदत करत इरफान शेखजी शेख यांना फोन करून आपल्या घरी बोलावून त्यांचा पर्स वापस केला.गणपत बाबुराव कवडे हे आपले घरच परपंज भाजीपाला विकून चालवतात त्यांनी मिळालेल्या पर्स मधील चौईशे रुपयाला हात न लावता वापस केले त्यांचा या प्रामाणिकपणाचा समाज माध्यमातून कौतुक होत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# सरकारी नोकरदारांना ५ दिवस आधीच पगार मिळणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील शासकिय अधिकारी, कर्मचारी तसेच निवृत्ती वेतनधारक यांच्यासाठी शासनाने खुशखबर दिली आहे. गणेशोत्सव सणाचा उत्साह आणि गणेशोत्सवाची धूम लक्षात घेता ऑगस्ट महिन्याचा पगार ५ दिवस आधीच बँक खात्यात जमा केला जाणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांचे ऑगस्ट महिन्याचे वेतन २६ ऑगस्ट रोजीच देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे, साहजिकच सरकारी नोकरदारांचा गणेशोत्सावाचा आनंद द्विगुणीत झाला आहे.

राज्य सरकारकडून शासन निर्णय काढून १ सप्टेंबर रोजी होणारे कर्मचारी व अधिकार्यांचे वेतन २६ ऑगस्ट रोजी देण्यास सरकारकडून मान्यता देण्यात आली आहे. जिल्ह परिषद, मान्यता प्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था, अकृषि विद्यापीठे/ कृषी विद्यापीठे व त्यांच्या संलग्न अशासकीय महाविद्यालयांचे अधिकारी व कर्मचारी तसेच निवृत वेतनधारकांन / कुटुंब निवृत वेतन धारक यांनाही हा निर्णय लागू राहणार आहे. त्यामुळे, या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाला तब्बल ५ दिवस आधीच आपला पगार मिळणार आहे. त्यामुळे, गणेशोत्सव काळाती खर्चासाठी खिसा गरम आणि हात ढिला होणार आहे. दरम्यान, गणेशोत्सवात बाप्पांच्या आगमनाची आतुरता घरोघरी पाहायला मिळते, त्यासाठी मंडप सजावट ते गोडधोड पदार्थांची रेलचेल असते. अधिक खर्च करत भाविक सेलिब्रेशन करतात. त्यामुळेच, सरकारने ५ दिवस आधीच पगार देण्याचा निर्णय घेतला आहे.

**गणेशोत्सवात ५ दिवस १२ वाजेपर्यंत परवानगी**

आगामी गणेशोत्सवासाठी गणेश मंडळांनी गणेश भक्तांसाठी आनंदाची बातमी आहे. गणेशोत्सव काळात गणेश मंडळांना रात्री बारा वाजेपर्यंत देखावे दाखवण्यासाठी शेवटचे पाच दिवस दिले जाणार असल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी कराड येथे दिली आहे. याबाबतचा आदेश लवकरच मुख्यमंत्री जाहीर करणार आहेत, असेही ते म्हणाले.




**कोकणात जाणाऱ्या भाविकांना टोलमाफी**

यंदाच्या गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत मुंबई-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील टोल नाक्यांवर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या वाहनांना आणि एसटी बसेसना टोलमाफी मिळणार आहे. त्यासाठी गणेशोत्सव २०२५ - कोकण दर्शन या नावाचे विशेष टोलमाफी पास देण्यात येणार असून त्यावर वाहन क्रमांक व वाहन मालकाची माहिती नोंदवली जाईल.

## चंद्रभागा नदी दुथडी भरून, चंद्रभागेचं विहंगम ड्रोन दृश्य



पंढरपूर मध्ये चंद्रभागा नदीला पूर आलेला असून चंद्रभागा नदीच्या पात्रातील मंदिरे पाण्याखाली गेली आहेत, व्यास नारायण झोपडपट्टी, गोपाळपूर पूल, दगडी पूल यासहसहा बंधारे पाण्याखाली गेले आहेत छायाचित्रकार राहुल गोडसे यांनी ड्रोन कॅमेरातून पुराचे विहंगम दृश्य टिपलेले आहे

## पक्ष्यांची विक्री करणाऱ्यांना वनविभागाकडून अटक

**नवी मुंबई/प्रतिनिधी:** उरण येथील वनविभागाला मिळालेल्या माहितीनुसार दि.१८ ऑगस्ट रोजी संभाजीनगर येथून एक व्यक्ती उलवे याठिकाणी पेट शॉप असलेल्या व्यक्तीला जवळपास ४२ मुनिया जातींचे पक्षी विकण्यासाठी येणार असल्याची खबर मिळताच वनविभागाकडून बनावट गिर्हाईक पाठवून पक्षी घेऊन आलेल्या आरोपी व उलवे येथील पेट शॉप चालकाला अटक करण्यात आली आहे. दोघांनाही पनवेल कोर्टात हजर केले असता त्यांना २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तर कोर्टाच्या आदेशानुसार ४२ पक्षांना उरण येथील नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले आहे. व्हाट्सअपमुळे या प्रकरणाचा उलगडा झाला असून, पक्षी विकणारा व विकत घेणारे दोघांचे व्हाट्सअप चॅट वन विभागाच्या अधिकाऱ्यांना सूत्रांद्वारे मिळाले आणि त्यानंतर हा प्रकरण उघडं झाले आहे.

## तान्हा पोळा उत्सवाची तयारी गांधी चौकात रंगीबेरंगी नंदीबैलांची खरेदीला उत्स्फूर्त प्रतिसाद



**हंडरपूर/प्रतिनिधी:** तान्हा पोळा उत्सव अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने चंद्रपूर शहरात उत्सवाची धामधूम सुरू झाली आहे. गांधी चौकात लहान मुलांसाठी आकर्षक सजावटीने तयार केलेले विविध प्रकारचे रंगीबेरंगी लाकडी नंदीबैल विक्रीस आले असून, खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली आहे.

या नंदीबैलांची खासियत म्हणजे ते सागवान व इतर टिकाऊ लाकडापासून कुशल कारागिरांकडून तयार केले जातात. या पारंपरिक व्यवसायाशी ४० वर्षांपासून जोडलेले एक विक्रेता म्हणाले, मी चार दशकांपासून या व्यवसायात आहे. हे केवळ खेळण्यापुरते मर्यादित नाही, तर एक परंपरा आहे.

नंदीबैल घरी आणल्यानंतर बालक तान्हा पोळ्याच्या दिवशी त्याची विधीवत पूजा करतो. यासोबतच किमान चार लोकांना सहभागी करून पूजा विधी पार पडतो, अशी माहिती खरेदीस आलेल्या एका ग्राहकाने दिली.

तान्हा पोळा हा लहान मुलांसाठीचा सण असून, शेतकऱ्यांच्या बैलपोळ्याच्या पूर्वसंध्येला साजरा केला जातो. या निमित्ताने मुलांना कृषी संस्कृतीची ओळख करून देण्याचा प्रघात आहे. त्यामुळे नंदीबैल खरेदीसाठी पालकांचा उत्साहही लक्षवेधी ठरत आहे.

## नातवाचा बुडून मृत्यू झाल्याच्या मानसिक धक्क्यामुळे आजोबांनीही त्यागला देह !

### दिग्रस येथील हृदयद्रावक घटनेमुळे सर्वत्र हळहळ

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**यवतमाळ :** दारव्हा येथे काल ता २० १३ वर्षीय नातवाचा रेल्वेच्या खड्ड्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली . याचा जबर मानसिक धक्का बसल्याने दिग्रस येथील त्याच्या आजोबांनीही देह त्यागला. सदर हृदयद्रावक घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

याबाबत सविस्तर असे की दारव्हा येथील रेल्वे स्टेशन परिसरात वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वेच्या उड्डाणपूलासाठी खड्डा खोदण्यात आला. मागील दोन-तीन दिवसापासून सुरू असलेल्या सतत पावसामुळे यात पाणी साचले होते. काल चार शाळकरी मुलांना या खड्ड्यात पोहण्याचा मोह आवरता आला नाही. यात चौघांचाही



बुडून करुण अंत झाला . यात १३ वर्षीय रैहान असलम खान याचा देखील समावेश होता. सदर माहिती मिळताच दिग्रस येथील त्याचे वृत्तपत्र वितरक आजोबा मुनीर खान शमशेर खान उर्फ मुन्नाभाई पेपरवाले वय ६८ तसेच इतर नातेवाईक सायंकाळी दारव्हा येथे पोहोचले.मात्र मुनीर खान यांना एकुलत्या नातवाच्या आकस्मिक मृत्यू झाल्याचा जबर मानसिक धक्का बसल्याने त्यांनी दारव्हा येथे मुलीच्या घरीच रात्री देह त्यागला. सदर हृदयद्रावक घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मुनीर खान यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. मागील अनेक वर्षांपासून वृत्तपत्र वितरक म्हणून कार्य करत ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. विशेष म्हणजे त्यांचा अत्यंत बोलका व मनमिळाऊ स्वभाव असल्यामुळे ते चीर परिचित होते. काल दिवसभर त्यांनी घरची कामे आटोपली व अनेक लोकांच्या भेटी घेतल्या . अन रात्री ११ वाजताच्या सुमारास बोलता बोलताच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला.

आज गुरुवारी एकाच दिवशी दुपारी नातवाची अंत्ययात्रा दारव्हा येथे निघाली तर सायंकाळी आजोबांना दिग्रस येथे अत्यंत शोकाकूल वातावरणात सुपुर्द-ए-खाक करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, पाच मुली, एक मुलगा, नातवंडे, भाऊ, मित्र असा मोठा परिवार आहे

## बुलढाण्यात लम्पीमुळे बैलपोळा बाजारात शुकशुकाट; लाखोंची उलाढाल ठप्प

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** मागील दोन महिन्यांपासून जनावरांवरील लम्पी आजाराने जिल्ह्यात धुमाकूळ घातला आहे.आतापर्यंत या आजारामुळे ८३२ लागण झाली होती. त्यापैकी ४८६ जनावरे बरी झाले होते.तर २९९ जनावरांवर सध्या उपचार सुरू आहे.. मात्र लंपी ची लागण झाल्याने ३४ जनावरांचा मृत्यू झाला होता.

या आजाराची लागण इतर जनावरांना होवू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यात बैल पोळा घरी पूजन करुन साजरा करण्यात यावा असे





आदेश देण्यात आले होते.

बळीराजासाठी दिवाळीपेक्षाही मोठा सण म्हणजे बैलपोळा. एका दिवसावर येऊन ठेपलेल्या बैलपोळा सणावर आणि बळीराजाच्या उत्साहावर या आदेशामुळे विरजण पडलं आहे. बुलढाणा बाजारात शुकशुकाट दिसून येत आहे. बैलांचे साज घेवून लांबून आलेल्या दुकानदारांनी आपली दुकाने थाटली आहे.. त्यांना ग्राहकांची आतुरता होती बैलांसाठी साज असलेल्या दुकानात हिंगोल डबी, रंग, गजरे, फुगे, घागरमाळी, सर, मुथुळी, घोगर, घोगराचे पट्टे, पैजण, घंट्या, पट्टा, बेलाचे जोते, घुंगरू, शिंगच्या शेंब्या, मोऱ्हक्या, कासरा, बाशिंग शेंब्या, बैलाच्या पायात बांधण्यासाठी चवर आदींची दुकाने थाटली आहे.

## संक्षिप्त...

### बारावेत अनैतिक संबंधातून जन्मलेले नवजात अर्भक, अल्पवयीन आईवर रुग्णालयात उपचार सुरु





दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी:** कल्याण पश्चिमेकडील बारावे परिसरात दोन दिवसांपूर्वी सकाळच्या सुमारास कचराकुंडीलगत कचऱ्यातून लहान मुलाच्या रडण्याचा आवाज येत होता. नागरिकांच्या लक्षात आल्याने निरखून पाहिले असता एका गोणीत एक दिवसाचे स्त्री जातीचे अर्भक असल्याचे आढळले. नागरिकांनी या बाळाला उचलून घेत खडकपाडा पोलिसांना याबाबतची माहिती दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बाळाला बालसंगोपन केंद्रात पाठवत तिला कचऱ्यात फेकणाऱ्या आई-वडिलांचा शोध सुरू केला होता. आजूबाजूचे सीसीटीव्ही फुटेज तसेच परिसरात चौकशी केल्यानंतर समोर आलेलं सत्य पाहून पोलिसांना धक्का बसला. या बाळाला १५ वर्षीय अल्पवयीन मुलीने जन्म दिला होता. अल्पवयीन मुलीला आई-वडील नसून ती घरात एकटीच राहत होती, तर तिचे आजी आजोबा गावी राहतात. एकटी असल्याची संधी साधत एका २२ वर्षीय तरुणाने तिच्याशी मैत्री वाढवली यातून ती गर्भवती राहताच नऊ महिने तिला घराबाहेर पडण्यास मज्जाव केला. नऊ महिन्यानंतर घरातच त्याने मुलीला जन्म देण्यासाठी या मुलीला मदत करत जन्माला येताच हे बाळ कचराकुंडीत फेकून दिले होते. यानंतर तो निघून गेला होता. पोलिसांनी या २२ वर्षीय तरुणाला टिटवाळा परिसरातून बेड्या ठोकल्या आहेत. तर या अल्पवयीन मुलीची प्रकृती ठीक नसल्याने तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे खडकपाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांनी सांगितले.

### गंगापुरला भावानेच केला भावाचा खून, मुद्देश वाडगावच्या खुनाचा उलगडा

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी:** गंगापूर तालुक्यात हादरून सोडणाऱ्या मुद्देश वाडगाव येथे दोन सख्ख्या चुलत भावाच्या आढळलेल्या मृतदेहामुळे गंगापूर तालुक्यात खळबळ उडाली होती. मात्र, गंगापूर पोलिसांनी या घटनेचा उलगडा केला असल्याची माहिती छत्रपती संभाजीनगर पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड यांनी दिली आहे.



सिद्धार्थ किराणा आणण्यासाठी घराबाहेर गेला होता. बराच वेळ उलटूनही तो परतला नाही. त्यानंतर शोध घेतला असता भारत दारुंटे यांच्या मक्याच्या शेताजवळ त्याची सायकल, रिकामी पिशवी आणि शंभर रुपयांची नोट पडलेली आढळली. त्याचबरोबर रक्ताचे डागही सापडले, जे थेट जवळच्या विहिरीकडे जात असल्याचे दिसून आले. मात्र, बिबट्याच्या हल्लात सिद्धार्थ मृत्यू पावल्याची अफवा पसरवण्यात आली होती. मात्र, सिद्धार्थच्या आईला (सुरेखा चव्हाण) संशय आल्याने सिद्धार्थचा खून झाला असल्याची तक्रार अज्ञात आरोपीविरुद्ध गंगापूर पोलिसात दाखल केली होती. त्या दिशेने गंगापूर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास चालू केला असता सिद्धार्थचा खून झाले असल्याचे प्रथमदर्शनी लक्षात आले. त्यादृष्टीने गंगापूर पोलिसांनी अनेक संशियतांचे जवाब नोंदवले, त्यात सिद्धार्थचा चुलत भाऊ स्वप्नील संजय चव्हाण (वय २३) याचाही जबाब घेतला होता. त्यामुळे त्याने खून केला असल्याने आपले काही खरं नाही, पोलीस आपल्याला आता पकडतील या भीतीने स्वप्नीलने आत्महत्या केली असल्याची माहिती पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड यांनी दिली. मात्र, घरगुती किरकोळ वादावरून मनात राग धरून सख्ख्या चुलत भावाचा खून करून स्वतःही आत्महत्या केल्याने एकाच कुटुंबातील दोन भाऊ गेल्याने परिसरात मात्र हळहळ व्यक्त होत आहे

### बीडमधील बेपत्ता होमगार्ड महिलेचा मृतदेह आढळला; विट्यात डंपरखाली चिरडून महिला ठार

**सांगली /प्रतिनिधी::** सांगली जिल्ह्यातील विटा शहरात अपघात झाल्याची घटना घडली आहे. विटा येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकातून निघालेल्या एका दुचाकीला डंपरने धडक दिली. यामध्ये एका महिलेचा चिरडून जागीच मृत्यू झाला आहे. प्रमिला तांबे (वय ६२) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. दुचाकीवरील चालकही जखमी झाला आहे. अपघातानंतर डंपर चालकास पकडून नागरिकांनी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तर बीडमध्ये बेपत्ता होमगार्ड महिलेचा मृतदेह नाल्यात आढळला आहे. या घटनेमुळं परिसरात खळबळ उडाली आहे. दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास विटा येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकातून एक दुचाकी सांगली रोडच्या दिशेने निघाली होती.

# शब्दाशी बांधिलकी जोपासणारा आमदार

## रोजगार मेळाव्याला युवकांचा प्रचंड प्रतिसाद






**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी:** पद.. पैसा.. अन् प्रतिष्ठा आणि देशातीलच नव्हे तर जगातील प्रसिद्ध मेट्रो सिटी असलेल्या मुंबई शहरामध्ये आलेशान जीवन जगत असताना गावाकडील भोळीभाबडी जनतेची होणारी ससेहोलपट ही मनाला नेहमीच अस्वस्थ करत असल्याने आपणही गावगड्यातील या जनतेसाठी काहीतरी करावे हा उदात्त हेतू ठेवून आणि मनाशी ठाम करार करून विधानसभा निवडणुकीमध्ये मैदानामध्ये उतरल्यानंतर आमदार सिद्धार्थ खरात यांनी जनतेला अपेक्षित असलेल्या विकासाचे आश्वासन दिले.अन् जनतेनेही भरभरून प्रेम देत आमदार सिद्धार्थ खरात यांच्या गळ्यात विजयाची माळ टाकली. साहजिकच त्यामुळे आमदार सिद्धार्थ खरात यांची जबाबदारी वाढली. पद मिळाल्यानंतर पदाचा वापर हा जनतेच्या कल्याणासाठी व्हावा हा उदात्त हेतू ठेवून आमदार सिद्धार्थ खरात यांनी हार तुऱ्यामध्येच न रमता प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.

मतदार संघातील विकास कामे करताना बेरोजगाराची दिसणारी फौज लक्षात घेता आमदार सिद्धार्थ खरात यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने भव्य रोजगार मेळावा घेतला आणि या रोजगार मिळाला युवकांनीही प्रचंड असा प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे आपली वाटचाल केल्याने आमदार सिद्धार्थ खरात यांच्या प्रति शब्दाशी बांधिलकी जोपासणारा आमदार म्हणून मतदारसंघात चर्चा होत असून आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वतीने आयोजित रोजगार मेळाव्याचे चांगलेच कौतुक होत आहे.

आमदार सिद्धार्थ खरात यांनी निवडणूक काळात मतदारसंघातील समस्या जाणून घेऊन त्याबाबत उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले होते. निवडणुकीच्या विजयानंतर आमदार सिद्धार्थ खरात यांनी अवघ्या दोन महिन्यात आपल्या कामाचा सपाटा लावून मतदार संघातील शेकडो कामे मार्गी लावले.

मेहकर येथील एमआयडीसीचा प्रश्न असो अथवा बस स्थानकाचा प्रश्न, जलजीवन मिशनच्या रखडलेल्या कामांचा प्रश्न आदी रखडलेले कामे मार्गी लावून एक विकास पर्वाला प्रारंभ केला. मतदार संघातील विकास कामे करताना गावागावात दिसणारी व बेरोजगार युवकांची फौज, हाताला काम नाही म्हणून निर्माण होणाऱ्या अनेक समस्या यावर आपले लक्ष केंद्रित करत आमदार सिद्धार्थ खरात यांनी यापूर्वीही भव्य रोजगार मेळावा घेऊन ३०० विद्यार्थ्यांना नोकरी मिळवून दिली होती. तर, आता वाढदिवसाच्या औचित्य साधून मतदार संघातील तब्बल ३ हजार जागांसाठी मेहकर येथील कृषी वैभव लॉन येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन केले.यावेळी महाराष्ट्राबरोबरच संपूर्ण देशातील तब्बल ५१ कंपन्यांचे प्रतिनिधींना आमंत्रित करून युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिला. युवकांचा प्रचंड प्रतिसाद पाहता कंपनीच्या प्रतिनिधीने आम्हाला ५ हजार मुले पाहिजे असल्याची डिमांड केली. युवकांची गरज त्यांची काम करण्याची वृत्ती लक्षात घेउन युवकांना ऑफर दिली.

या रोजगामेळाव्यातत मार्गदर्शन करताना आमदार सिद्धार्थ खरात यांनी युवकांना फक्त कामच नाही. तर, कामाच्या मोबदल्यात योग्य दाम देण्याचे आवाहन कंपन्यांच्या प्रतिनिधींना केले. कंपनीच्या प्रतिनिधींनी ही आमदार यांच्या प्रतिसादाला आवाहनाला प्रतिसाद देत स्टेजवरच १८ हजार रुपयांच्यावर पेमेंट देण्याचे सर्वांसमोर जाहीर केले. त्यामुळे युवकांनी यावरून आमदार सिद्धार्थ खरात यांची युवकांप्रती असलेली तळमळ दिसून आली.आमदार खरात यांनी युवकांना यापेक्षाही जास्त रोजगार संधी मिळवून देण्याचे आश्वासन यावेळी देत आमदारकी ही पद भोगण्यासाठी नव्हे तर, जनतेच्या सेवेसाठी मी घेतलेली आहे. मी आश्वासनेच नाही दिले तर नियती सोबत करार केलेला आहे आणि तो मी करून दाखवीन. शब्दाचा मी बांधील आहे असे ठोस आश्वासन व्यासपीठावर देत युवकांची मने जिंकली.

त्याचबरोबर आमदार सिद्धार्थ खरात यांनी शेतकऱ्यांसाठीही मला भरपूर काम करायचे असल्याचे सांगून मेहकर मतदार संघ हा राज्याच्या नकाशावर मी चमकवेल असे म्हणत या सत्कर्मासाठी जनतेला सहकार्य करण्याचे आवाहन करताच जनतेनेही त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आमदार सिद्धार्थ खरात यांनी वाढदिवसानिमित्त घेतलेल्या भव्य रोजगार मेळाव्यातून मेळाव्याने जनतेचा लोकप्रतिनिधी कसा असावा, वाढदिवस हा पार्ट्या किंवा हार तुरे घेण्यापुरताच नसावा या निमित्ताने जनतेची सेवा करण्याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासाला आपला उपयोग व्हावा, यासाठी केलेला हा छोटासा प्रयत्न मतदार संघातील जनतेचे आयुष्य बदलण्यासाठी नक्कीच उपयोगात येईल अशी चर्चा आता मतदारसंघात होऊ लागली आहे. तर आमदार सिद्धार्थ खरात यांच्या रूपाने पुढाकाराने पहिल्यांदाच एवढा भव्य दिव्य रोजगार मेळावा झाल्याने लोकप्रतिनिधी कसा असावा हेही या निमित्ताने दाखवून देत आपण शब्दाशी बांधील आहे आणि ते पूर्ण करण्यासाठी सतत प्रयत्न चालू असल्याचे यावरून दिसून आले आहे.

---

## विविध वृत्त...

### फिट इंडिया सायकलिंग ड्राइव्ह विशेष उपक्रमात सायकलथॉनचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी:** फिट इंडिया सायकलिंग ड्राइव्ह या विशेष उपक्रमांतर्गत वाशिम येथे सायकलथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा पोलीस अधिक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा २३ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता पोलीस मुख्यालय, वाशिम येथून सुरू होणार आहे.

या स्पर्धेत जिल्ह्यातील युवक-युवतींसह सर्व इच्छुक सायकलस्वारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस उपअधीक्षक (गृह) प्रविण खंडारे यांनी केले आहे.

### योगेश कुंभेजकर यांनी जिल्हाधिकारी पदाची सूत्रे स्वीकारली



**वाशीम/प्रतिनिधी:** जिल्ह्याचे नवीन जिल्हाधिकारी म्हणून योगेश कुंभेजकर यांनी २१ ऑगस्ट रोजी पदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील आणि निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी त्यांचे स्वागत केले. श्रीमती बुवनेश्वरी एस. यांची राज्य शासनाने अकोला येथे महाबीजच्या व्यवस्थापकीय संचालकपदी बदली केली आहे. त्यांच्या जागी वाशिम जिल्ह्याचे नवे जिल्हाधिकारी म्हणून योगेश कुंभेजकर यांची नियुक्ती करण्यात आली. यासंदर्भातील आदेश सामान्य प्रशासन विभागाने २० ऑगस्ट रोजी जारी केले होते. नुतन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर हे २०१६ बॅचचे आयएएस अधिकारी असून, त्यांनी यापूर्वी भंडारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तसेच नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून यशस्वी कामकाज पाहिले आहे. वाशिम येथे रुजू होण्यापूर्वी ते महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते.

### गौरीच्या मूर्त्या व मुखवटे बाजारात दाखल

**नवी मुंबई/प्रतिनिधी:** गणेशोत्सव सणाच्या निमित्त गौरीच्या मुर्त्या व मुखवट्यांनी नवी मुंबईतील बाजारपेठ सजली असून, नागरिकांची खरेदीसाठी दुकानात गर्दी पाहायला मिळत आहे. गौरीच्या मुर्त्या व मुखवटे १००० ते ८००० रुपयांपर्यंत मिळत असून, फायबने बनवलेल्या मुर्त्यांना जास्त मागणी आहे. पीओपीच्या मुर्त्यांना यावेळी मागणी कमी असल्याचे दुकानदारांनी सांगितले. त्याच बरोबर या मुर्त्या सातारा, सांगली, भोर, कराड याठिकाणाहून बाजारात दाखल झाल्या आहेत.

---

## आगामी होऊ घातलेल्या सन उत्सवा दरम्यान अंश मंगल कार्यालय येथे शांतता समितीची सभा संपन्न

### डिजे तमाशा आणि दारू मुक्त आगामी सन उत्सव साजरे करा - पोलीस अधीक्षक कुमार चिंता




**दैनिक आपला विदर्भ**

**■ अयाज काजी**

**यवतमाळ:** आगामी होऊ घातलेल्या सण उत्सवा दरम्यान अंश मंगल कार्यालय येथे शांतता समितीची सभा आज रोजी संपन्न झाली

आगामी होऊ घातलेल्या सण उत्सव पोळा श्री गणेशोत्सव गौरी पूजन ईद-ए-मिलाद नवरात्री उत्सव दसरा धम्मचक्र प्रवर्तन दिन व जातीय धार्मिक सलोखा वृद्धिगत करण्यासाठी कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी अंश मंगल कार्यालय येथे शांतता समितीची सभा आयोजित करण्यात आली यावेळेस प्रामुख्याने पोलीस अधीक्षक कुमार चिंता अप्पर पोलीस अधीक्षक उपविभागीय अधिकारी पुसद आशिष बिज्वाल उपविभागीय पोलीस अधिकारी दारव्हा डॉक्टर सिद्धेश्वर भोरे नायब तहसिलदार सोनकुसरे पोलीस निरीक्षक दिग्रस श्री वैजनाथ मुंडे मुख्याधिकारी अतुल पंत दिग्रस तालुक्यातील पोलीस पाटील यासह दिग्रस शहरातील प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार बांधव शांतता समितीच्या सभेला उपस्थित होते

---

## कारंजा लाड येथे जनसुरक्षा शिबिर नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आपला विदर्भ**




**वाशीम/प्रतिनिधी:** ि स्टेट बँक ऑफ इंडिया व जिल्हा अग्रणी बँक, वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने कारंजा लाड येथे जनसुरक्षा शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे अध्यक्षपद प्रादेशिक संचालक रिझर्व बँक ऑफ इंडिया नागपूर सचिन वाय. शेंडे यांनी भूषविले.

या प्रसंगी उपमहाप्रबंधक, रिझर्व बँक ऑफ इंडिया नागपूर अंजना श्यामनाथ, उपमहाप्रबंधक स्टेट बँक ऑफ इंडिया अमरावती शशी रंजन, क्षेत्रीय व्यवस्थापक स्टेट बँक ऑफ इंडिया अकोला आशिष कुमार सिंह, उपमहाप्रबंधक, स्टेट बँक ऑफ इंडिया किसले कुमार तसेच जिल्हा व्यवस्थापक, रिझर्व बँक ऑफ इंडिया नागपूर हर्षल चितळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कारंजा लाड येथील सर्व बँक शाखा प्रमुखांनीही शिबिरात सहभाग घेतला.

विविध ग्रामपंचायतींमधून दोनशेहून अधिक नागरिकांनी हजेरी लावून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रादेशिक संचालक सचिन वाय. शेंडे यांनी नागरिकांना बँक खात्याची केवायसी पूर्ण करून प्रधानमंत्री सुरक्षा विमा व जीवन ज्योती विमा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. उपमहाप्रबंधक अंजना श्यामनाथ यांनीमार्गदर्शन केले. उपमहाप्रबंधक शशी रंजन यांनी अटल पेन्शन योजनेचे महत्व स्पष्ट करत सर्व युवकांना त्याचा लाभ घ्यावा असे सांगितले. जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक यशवीर कुमार यांनी विविध योजनांबाबत माहिती दिली. विशेष म्हणजे अटल पेन्शन योजनेअंतर्गत वाशिम जिल्ह्याने राज्यात प्रथम स्थान मिळविल्याची गौरवाची नोंद त्यांनी या वेळी केली. कार्यक्रमाचा समारोप क्षेत्रीय व्यवस्थापक आशिष कुमार सिंह यांनी सर्वांचे आभार मानून केला. या प्रसंगी नागरिकांना आवाहन करण्यात आले की, त्यांनी आपल्या ग्रामपंचायत शिबिरामध्ये अथवा जवळच्या बँक शाखेमध्ये जाऊन खात्याची केवायसी करून घ्यावी आणि सर्व शासकीय योजनांचा लाभ घ्यावा. अशी माहिती जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार यांनी दिली.

---

## नुकसानग्रस्तांना आवश्यक मदत मिळवून देऊ - पालकमंत्र्यांची ग्वाही

**दैनिक आपला विदर्भ**




**वाशीम/प्रतिनिधी:** वाशीम जिल्ह्यात १५ ते १८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर जीवितहानी, जनावरांचे मृत्यू, शेतीपिकांचे नुकसान व घरांची पडझड झाली आहे. या नुकसानीचे व्यवस्थित पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. नुकसानग्रस्तांना आवश्यक मदत मिळवून दिली जाईल, अशी ग्वाही कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते. प्राथमिक अहवालानुसार, वाशिम तालुक्यात ९८ गावे बाधित होऊन ३९,३१० हेक्टर क्षेत्रावर, रिसोड तालुक्यात ८५ गावे बाधित होऊन ४८,६४५ हेक्टर क्षेत्रावर, मालेगाव तालुक्यात १२७ गावे बाधित होऊन ५०,३११ हेक्टर क्षेत्रावर, मंगरूळपीर तालुक्यात ७४ गावे बाधित होऊन १०,४८९ हेक्टर क्षेत्रावर, कारंजा तालुक्यात १ गाव बाधित होऊन ५.९९ हेक्टर क्षेत्रावर तर मानोरा तालुक्यात ६ गावे बाधित होऊन १८५ हेक्टर क्षेत्रावर नुकसान झाले आहे. वाशिम तालुक्यात ३, रिसोड तालुक्यात २ जनावरे व ३ हजार कोंबड्या, मालेगाव तालुक्यात १४ तर मंगरूळपीर तालुक्यात १६ अशा एकूण ३५ जनावरे आणि ३ हजार कोंबड्यांचा मृत्यू झाला आहे. घरांच्या पडझडीत वाशिम तालुक्यात ९७, रिसोड तालुक्यात १८४, मालेगाव तालुक्यात ७२ आणि मंगरूळपिर तालुक्यात ५१ अशा एकूण ४०४ घरांची अंशतः पडझड झाली आहे. जमिनीच्या नुकसानीत वाशिम तालुक्यातील ७ गावांमध्ये १६१ हेक्टर तर मालेगाव तालुक्यातील ४ गावांमध्ये ६७ हेक्टर जमिनीचे नुकसान होऊन एकूण २२८ हेक्टर क्षेत्र खरडून गेले आहे. यावेळी पालकमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, शेतकरी बांधवांनी धैर्य सोडू नये. शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. पंचनामे तातडीने करून मदत व नुकसानभरपाई देण्याचे काम सुरू असून मी स्वतः यावर लक्ष ठेवून आहे. कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.